तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६
फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/२०१७-१८ना हरकत/२०१७/411

दिनांक :
03 FEB 2017

परिपत्रक :

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदविका संस्थांच्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल ,जागेत बदल करणे,संस्था बंद करणे,अभ्यासक्रम बंद करणे ,इत्यादी करिता शासनाचे ना-हरकत प्रस्तावाबाबत

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक दि.०२.०२.२०१७

उपरोक्त विषयाशी निगडीत संदर्भीय परिपत्रक सोबत जोडलेले आहे.सदर परिपत्रकामधील अ.क्र.१,४,६,७,१०,१२,१६,१९ मधील संस्थांनी सादर केलेल्या विषयांकित प्रस्तावामध्ये त्यांचे नावासमोर रकाना क्र.५ मध्ये आढळून आलेल्या त्रुटी दर्शविल्या आहेत. सदर त्रुटींची पूर्तता करणारी कागदपत्रे संबंधित संस्थांनी विहित मुदतीमध्ये संचालनालयास सादर करावीत. अन्यथा सदर संस्थांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ना –हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतच्या शिफारशी शासनास सादर करण्यात येणार नाहीत व त्यामुळे होणा-या विलंबाची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालकाकरिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/एआयसीटीई/२०१७-१८/ना-हरकत/३०९९

दिनांक : - 2 FEB 2017

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून राज्यात व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या/ अभ्यासक्रमाच्या नावात, जागेत बदल करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, पदविका अभ्यासक्रम बंद करणे, को-एज्युकेशन करणे, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ. करीता शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्राबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक : अप्रुव्हल/१२(११)/२०१६.

२. या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एनजीपी/एआयसीटीई/२०१७-१८/ना-हरकत/३०१५, दिनांक : १३.१.२०१७.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ऍप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१७-१८ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक ५.१.२०१७ ते दिनांक ४.२.२०१७ या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भ क्रमांक १ वरील जाहिरातीच्या अनुषंगाने राज्यात शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्त्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपातंरीत करणे, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ. बाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था परीषदेच्या सूचनेनुसार प्रस्ताव सादर करणार आहेत, अशा संस्थांमार्फत शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत खालील तक्त्यात नमूद संस्थांकडून या संचालनालयास प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. संबंधीत संस्थांनी संदर्भ क्रमांक 2 वरील संचालनालयाच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे (सोबत प्रत जोडली आहे) संबंधीत संस्थेंच्या नावासमोर नमूद स्तंभ क्रमांक 5 मध्ये नमूद कागदपत्र संचालनालयास सादर न केल्यामुळे सदर संस्थांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनास करावयाच्या शिफारशी संचालनालय स्तरावर प्रलंबित ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर संस्थांची व संस्थानिहाय प्रस्तावातील त्रुटींची माहिती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	डीटीई कोड क्र.	प्रस्तावाचे स्वरुप	संचालनालयास प्राप्त दिनांक	संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक २ वरील परिपत्रकानुसार प्रस्तावातील त्रुटी
१	२		३	४	५
१.	श्री बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, अंबपचे, अशोकराव माने पॉलिटेक्नीक, सावे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.	६८३०	संस्था बंद करणे	२७.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
२.	तंत्र व वैद्यक शिक्षण मंडळ संचलित, जे.टी. महाजन तंत्रनिकेतन, न्हावी मार्ग, फैजपूर, ता. यावल, जि. जळगांव-४२५५२४	५२२९	कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम बंद करणे	२७.१.२०१६	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत).
३.	श्री साई शिक्षण संस्थेचे, एनआयटी पॉलिटेक्नीक, सर्वे नं. १३/२, महुझरी, फेट्री जवळ , काटोळ रोड, नागपूर-४४१५०१.	४२४८	इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम बंद करणे	२५.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ४. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
४.	दिनकरराव के. शिंदे स्मारक ट्रस्ट, गडहिंग्लज संचलित डॉ. ए.डी. शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, भादगाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर-४१६५०२.	६४३४	इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम बंद करणे	२५.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
५.	वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिट्यूट, एच.आर. महाजनी मार्ग, माटुंगा, मुंबई-४०००१९.	३०१२	टेक्नीकल केमिस्ट्री या अभ्यासक्रमाचे नाव बदल करणे	१०.१.२०१७	१. हमीपत्र (मुळप्रत). २. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ३. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.

६.	भारतीय विद्यापीठाचे, जवाहरलाल नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी(पॉली), पुणे सातारा रोड, धनकवडी, पुणे-४११०४३.	६४०८	इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभ्यासक्रम बंद करणे	२४.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
७.	भारती विद्यापीठाचे, इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलीटेक्नीक) पलूस, ता. पलूस, जि. सांगली-४१६३१०.	६४२२	इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग	२५.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
८.	श्री शंकर नारायण एज्युकेशन ट्रस्टचे, प्रविण पाटील कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी, भाईंदर (पु.), जि. ठाणे-४०११०५.	३२७७	पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे	२४.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ४. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
९.	एल. अँड टी. इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई	३२५९	संस्था बंद करणे	२३.१२.२०१६	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ४. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
१०.	पुणे डिस्ट्रीक्ट एज्युकेशन असोसिएशनचे, इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मांजरी रोड, हडपसर, पुणे-४११०२८.	६४१७	इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम बंद करणे	६.११.२०१६	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ४. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.

११.	के.के. वाघ एज्युकेशन सोसायटीचे, के.के. वाघ वूमेन्स पॉलिटेक्नीक, हिराबाई हरीदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३.	५२३६	संस्था बंद करणे	११.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २.विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
१२.	नवभारत शिक्षण मंडळ, सांगलीचे, शांतिनिकेतन पॉलिटेक्नीक, सांगली.	६४४०	संस्था बंद करणे	७.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २.विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
१३.	रत्नेश्वरी पॉलिटेक्नीक, नांदेड-लातूर हायवे, व्हीलेज-विष्णूपुरी, जि. नांदेड-४३१६०६.	२५४०	ऑटोमोबाईल इंजिनिअरींग अभ्यासक्रम बंद करणे	११.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
१४.	झगडू सिंग चॅरिटेबल ट्रस्टचे, ठाकूर पॉलिटेक्नीक, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदीवली (पु.), मुंबई-४००१०१.	३१४३	इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग अभ्यासक्रम बंद करणे	१२.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ४. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
१५.	विद्यावर्धिनीचे, भाऊसाहेब वर्तक पॉलिटेक्नीक, वसई रोड (पश्चिम रेल्वे), जि. ठाणे-४०१२०२.	३२६२	अभ्यासक्रमांचे नाव बदल करणे	१७.१.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ४. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.

१६.	श्री मौनी विद्यापीठाचे, इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हील अँड रुरल इंजिनिअरींग, (विनाअनुदानित विभाग) हुतात्मा मुरलीधरनगर, गारगोटी, जि. कोल्हापूर-४१६२०९.	६०१८	इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन हा अभ्यासक्रम बंद करणे	२९.१२.२०१६	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २.विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
१७.	श्री महावीर एज्युकेशन सोसायटीचे, इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्नीक), म्हसरुळ, वरवंडी रोड, नाशिक-४२२२०२.	५२३८	संस्थेच्या नावात बदल करणे	१.२.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. संस्थेचा ठराव (मुळप्रत)
१८.	श्री महावीर एज्युकेशन सोसायटीचे, इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (फार्मसी), म्हसरुळ, वरवंडी रोड, नाशिक-४२२२०२.	५२८१	संस्थेच्या नावात बदल करणे	१.२.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
१९.	शांती एज्युकेशन सोसायटीचे, ए.जी. पाटील पॉलिटेक्नीक इन्स्टिट्यूट, १८/२/२ ए, प्रताप नगर, एसआरपी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर-४१३००८.	६४४३	इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम बंद करणे	१.२.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

२०.	श्री दत्तकृपा शैक्षणिक अँड कृषी ग्रामविकास प्रतिष्ठानचे, सिध्दीविनायक पॉलिटेक्नीक, सिध्दटेक बेर्डी, ता. कर्जत, जि. अहमदनगर.	५२५९	इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम बंद करणे	१.२.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
२१.	कै. श्री विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टचे, कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी, बोळींज, विरार, ता. वसई, जि. पालघर-४०१३०३.	३२२१	इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग अभ्यासक्रम बंद करणे	१.२.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ४. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
२२.	श्री समर्थ ॲकेडमीचे, श्री समर्थ पॉलिटेक्नीक, श्री	५३५६	इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम बंद करणे	१.२.२०१७	१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र. २. हमीपत्र (मुळप्रत). ३. संस्थेचा ठराव (मुळप्रत) ४. विहीत नोंदणी शुल्क भरल्याची पावती.

तरी, संबंधीत संस्थांनी संदर्भ क्रमांक 2 वरील संचालनालयाच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या नावासमोर नमूद उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्रमांक ५ मध्ये नमूद कागदपत्र विहीत मुदतीत संचालनालयास सादर करावेत अन्यथा संचालनालयामार्फत सदर संस्थांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतच्या शिफारशी शासनास सादर करण्यात येणार नाही व होणाऱ्या विलंबाची संपुर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
2. कार्यासन क्रमांक3 (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई (सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.)
3. निवडनस्ती.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/2017-18/ना-हरकत/ 3096

दिनांक : 13 JAN 2017

विषय : शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून राज्यात व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या/ अभ्यासक्रमाच्या नावात, जागेत बदल करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, पदविका अभ्यासक्रम बंद करणे, को-एज्युकेशन करणे, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ. करीता शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्राबाबत...

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक : अप्रुव्हल/12(11)/2016.(लोकसत्ता दिनांक : 2.1.2017)

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ऍप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक 5.1.2017 ते दिनांक 4.2.2017 या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपातंरीत करणे, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ. बाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था परीषदेच्या सूचनेनुसार प्रस्ताव सादर करणार आहेत, अशा संस्थांनी शासनामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शिफारस करण्याच्या दृष्टीकोनातून परिषदेमार्फत निर्धारित व खाली नमूद कागदपत्रांसह, **दिनांक 4.2.2017 पुर्वी किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदमार्फत वेळोवेळी अद्ययावत करण्यात येणाऱ्या अंतिम दिनांकापुर्वी** तसा स्वतंत्र प्रस्ताव (अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस सादर केलेल्या ऑनलाईन प्रस्तावा व्यतिरिक्त) थेट या संचालनालयास सादर करावा. प्रस्ताव प्राप्त न झालेल्या/विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावाची / कागदपत्रांची या संचालनालयामार्फत दखल घेतली जाणार नाही व अशा संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येणार नाही ह्या बाबीची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी. तसेच सदर संदर्भाधीन जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून ज्या संस्थांनी उपरोक्तकरीता ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत संचालनालयास प्रस्ताव सादर केलेला असेल त्या संस्थांनी खालील नमूद कागदपत्र प्रस्तावासोबत जोडलेले आहेत याची शहानिशा करुन उर्वरित कागदपत्र तात्काळ या संचालनालयास पुर्वीच्या प्रस्तावाचा संदर्भ देवून त्यासोबत संचालनालयास सादर करावेत.

1. पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपातंरीत करणे, पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ. इ. बाबत संबंधीत संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांची स्वाक्षरी असलेली संस्थेच्या ठरावाची मुळ प्रत.

2. पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपातंरीत करणे, इ. बाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत. तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणेसाठी संबंधीत विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

3. अभ्यासक्रम / संस्था बंद करण्यासाठी संबंधीत अभ्यासक्रमांसाठी संयुक्त खात्यात मुदतठेव ठेवण्यात आली असल्यास सदर मुदतठेवींची साक्षांकित प्रत.

4. तसेच सदर पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात, ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपातंरीत केल्यानंतर/ पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर केल्यानंतर प्रवेशित विद्यार्थी किंवा नेमणुक केलेले कर्मचारी यांचे पर्यायी समायोजन कसे करणार याबाबतची कार्यपध्दती नमूद करुन याबाबत काही न्यायालयीन प्रकरण उध्दभल्यास त्यास पूर्णपणे संस्था जबाबदार राहील अशा आशयाचे 100 रु. च्या स्टँपपेपर वर संस्थेत केलेल्या नोंदणीकृत हमीपत्राची मुळप्रत.

5. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण 2013/प्र.क्र.43/तांशि-4, दि. 21.8.2013 मध्ये संबंधीत प्रस्तावाकरीता विहीत केल्याप्रमाणे नोंदणी शुल्क संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत शासनास भरलेल्या पावतीची साक्षांकित छायाप्रत.

6. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणेबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अॅप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 प्रमाणे आवश्यक कागदपत्रांसह संबंधीत विभागीय कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या तपासणीचा तपासणी अहवाल.

तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत (Non-Zero) घट करणे, व्दितीय पाळीतील पदविका अभ्यासक्रम बंद करणेबाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत या संचालनालयास प्रस्ताव सादर केले आहेत. अशा संस्थाना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या Approval Process Handbook 2017-18 मधील पृष्ठ क्रमांक 147 वरील 17.6 मध्ये अनुक्रमांक 4 मध्ये "NOC shall not be required for closing of the second Shift or reduction in Intake of Course/ Programme by reduction in number of divisions." असे नमूद केलेले असल्याने व्दितीय पाळीतील अभ्यासक्रम बंद करण्याबाबत तसेच ज्या अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता तुकडीने(number of divisions) कमी होत असेल अशा बाबतीत शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्यामुळे याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत या संचालनालयामार्फत शासनास शिफारस करण्यात येणार नाही ह्या बाबीची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
2. कार्यासन क्रमांक3 (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई (सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.)
3. निवडनस्ती.